मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल



बातमी व जाहिराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२




# सांगवी येथे शिव महापुराण कथा पर्वाला सुरवात!

## लक्ष्मण जगतापांनी समाजसेवेसह अध्यात्मिक धागाही जपला..!

**पिंपरी-चिंचवड। न्यूज एक्स्प्रेस मराठी।**

पुणे सर्वार्थाने धार्मिक व पावन जिल्हा असून,आम्ही भाग्यवान आहोत की आम्हाला पं. प्रदीप मिश्रा यांचे विचार ऐकायला मिळणार आहेत. छत्रपती शिवाजी महाराज यांचा जन्मदेखील याच जिल्ह्यात झाला. ज्यांच्यामुळे देव-देश आणि धर्म वाचला. या जिल्ह्यात लोकनेते लक्ष्मणभाऊ जगताप यांनी राजकारण, समाजकारण यासह त्यांनी धार्मिक धागाही जपला. असे गौरवोद्गार राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी काढले.



श्री अष्टविनायक शिव महापुराण कथेचे आयोजन लोकनेते लक्ष्मण जगताप मित्र परिवाराच्या वतीने पीडब्ल्यूडी मैदान, नवी सांगवी येथे केले आहे. या कार्यक्रमाचे औपचारिक उद्घाटन राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी कार्यक्रमाचे मुख्य निमंत्रक व भाजपाचे शहराध्यक्ष शंकर पांडुरंग जगताप, चिंचवडच्या आमदार अश्विनी लक्ष्मण जगताप, श्री. अण्णाजी महाराज, पं. भागवताचार्य, बाळासाहेब काशीद, पं. भवानी शंकर, संत मनसुख महाराज, रामेश्वर शास्त्री आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते. यावेळी कार्यक्रमाचे निमंत्रक तथा भाजपचे शहराध्यक्ष शंकर पांडुरंग जगताप यांनी प्रास्ताविक केले. परमपूज्य प्रदीपजी मिश्रा यांचे प्रथमच आपल्या शहरात आगमन झाले आहे, आपल्या सर्वांच्या वतीने स्वागत करताना भगवान शंकराची कृपा आपल्यावर अशीच रहावी, अशी मनोकामना जगताप यांनी केली. सात दिवसांच्या या कार्यक्रमात सर्वांनी सहकार्य करावे, असे आवाहन देखील जगताप यांच्याकडून करण्यात आले. त्यानंतर जय श्रीराम आणि हर हर महादेवच्या घोषणांनी परिसर दुमदुमून गेला.

### दीड लाखांहून अधिक भाविक

» पं. प्रदीपजी मिश्रा यांचे अनेक भक्त गेल्या २ दिवसांपासूनच सभामंडपात ठाण मांडून बसले होते. आजच्या कथेच्या पहिल्याच दिवशी सुमारे दीड लाखांपेक्षा अधिक भाविक शिव पुराण ऐकण्यासाठी सभामंडपात आले होते. व्यवस्थापन करताना सुरक्षा रक्षक तसेच पोलिसांनी सतर्कता ठेवली. लक्ष्मणभाऊ जगताप प्रवेशद्वारातून सातत्याने गर्दीचा ओघ सभामंडपाकडे जात होता. उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील देखील जनसमुदाय आहे की, मुंबईतील समुद्र अशा शब्दांत व्यक्त झाले.

# प्राधिकरणातील मालमत्तांचीही होणार कर आकारणी

## पिंपरी चिंचवड महापालिकेचा निर्णय

**पिंपरी-चिंचवड। न्यूज एक्स्प्रेस मराठी।**

संरक्षण, प्राधिकरण हद्दीमधील मालमत्तांच्या खरेदी-विक्रीचे दस्त शासनाकडून नोंद होत नसल्याने मालमत्ता करवसुलीसाठी अडचण येत होती. त्यामुळे या मालमत्तांची नोटरी पद्धतीने मुद्रांकाच्या आधारे नोंदणी व हस्तांतरण करून करआकारणी करण्याचा निर्णय आयुक्त शेखर सिंह यांनी घेतला आहे. या निर्णयामुळे महापालिकेच्या उत्पन्नातही वाढ होणार आहे. पिंपरी-चिंचवड शहरालगत देहूरोड संरक्षण क्षेत्र आहे. शहरातील काही भाग रेडझोनमध्ये आहे. महापालिका हद्दीतील संरक्षण आणि प्राधिकरण भागातील मालमत्तांच्या खरेदी-विक्री व्यवहाराचे दस्त शासनाकडून नोंद होत नाहीत. त्या मालमत्तांची नोंद करण्याची मागणी नागरिकांसह लोकप्रतिनिधींनी केली होती. त्यानुसार आयुक्त सिंह यांनी निर्णय घेत नोंदणी व हस्तांतरण प्रक्रियेसाठी सवलत दिली. शहरातील संरक्षण विभाग क्षेत्रालगतच्या भागातील, पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण, राज्य-केंद्र सरकार अशा शासकीय संपादन क्षेत्रांतील अतिक्रमणे आणि महाराष्ट्र तुकडे बंदी कायद्यानुसार खरेदी-विक्रीस प्रतिबंधित अशा २५ हजार मालमत्तांना या निर्णयाचा लाभ होणार आहे. या



मालमत्तांचा व्यवहार साध्या नोटरी पद्धतीने मुद्रांकाच्या आधारे झाला असल्यास मूळ मालकाचे नाव नोंदवून खरेदीदाराचे नाव भोगवटादार म्हणून नोंदवून मालमत्तेची नोंद होणार आहे. ही कार्यवाही करत असताना मालकाची लेखी संमती ५०० रुपयांच्या नोटरी पद्धतीच्या मुद्रांकावर असणे आवश्यक आहे. यानुसार मालमत्तेच्या नोंदी व विभाजनाची कारवाई करावी, असे आयुक्त सिंह यांनी म्हटले आहे. रेडझोन, प्राधिकरण मालकीच्या जागेवर राहणाऱ्यांसाठी हा निर्णय आहे. शहरातील इतर भागांसाठी याचा वापर करता येणार नाही. गैरप्रकार झाल्यास संबंधितांवर शिस्तभंगाची कारवाई होईल. मालकीत काहीही बदल होणार नाही. प्राधिकरणाच्या जागेवरील मालमत्तांच्या मालकी जागी प्राधिकरण कायम राहणार आहे. रेड झोनमधील मालमत्तांच्या बाबतीत सात-बारावर नोंद असलेली व्यक्तीच मालक राहील. ही नोंद केवळ मालमत्ता करवसुलीसाठी केली जाईल. त्यामुळे बांधकाम नियमित झाले असे समजण्यात येणार नाही.

### २५ हजार मालमत्तांना होणार लाभ

» पिंपरी-चिंचवड शहरालगत देहूरोड संरक्षण क्षेत्र आहे. शहरातील काही भाग रेडझोनमध्ये आहे. महापालिका हद्दीतील संरक्षण आणि प्राधिकरण भागातील मालमत्तांच्या खरेदी-विक्री व्यवहाराचे दस्त शासनाकडून नोंद होत नाहीत. त्या मालमत्तांची नोंद करण्याची मागणी नागरिकांसह लोकप्रतिनिधींनी केली होती. त्यानुसार आयुक्त सिंह यांनी निर्णय घेत नोंदणी व हस्तांतरण प्रक्रियेसाठी सवलत दिली. शहरातील संरक्षण विभाग क्षेत्रालगतच्या भागातील, पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण, राज्य-केंद्र सरकार अशा शासकीय संपादन क्षेत्रांतील अतिक्रमणे आणि महाराष्ट्र तुकडे बंदी कायद्यानुसार खरेदी-विक्रीस प्रतिबंधित अशा २५ हजार मालमत्तांना या निर्णयाचा लाभ होणार आहे.

# तालेरा रुग्णालयातर्फे आरोग्य शिबीर उत्साहात!

## राष्ट्रीय क्षयरोग दुरिकरण मोहिमे अंतर्गत रुग्णांना औषधे व सकस आहार किट वितरीत

**पिंपरी-चिंचवड।**

**न्यूज एक्स्प्रेस मराठी।** तालेरा हॉस्पिटल पिंपरी चिंचवड महानगरपालिका तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका वैद्यकीय अधिक्षक डॉ. लक्ष्मण गोफणे यांच्या विशेष पुढाकाराने गुरुवार १४ सप्टेंबर २०२३ रोजी वेताळनगर व मोऱ्यानागर चिंचवड या ठिकाणी आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये लहान बालके, गरोदर महिला तसेच सर्व महिला-पुरुष यांचे बीपी शुगर रक्त तपासण्या मोफत औषध उपचार करण्यात आले. तसेच राष्ट्रीय क्षयरोग दुरिकरण मोहिमे अंतर्गत रुग्णांना औषधे व सकस आहार किट देण्यात आले. या कार्यक्रमाला नागरिकांकडून उत्स्फूर्त असा प्रतिसाद लाभला.



### शिबिरास या मान्यवरांची प्रामुख्याने उपस्थिती...

» कार्यक्रमाचे नियोजन शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे वेताळनगर शाखेचे उपविभाग प्रमुख कुदरत खान, शाखाप्रमुख मजिद शेख, कलावती नाटेकर, किशोर सातपुते, आश्विन मायनाळे राजू माशाळकर, महेश शेतसंधी, रमेश शेंडगे, खायुम पठाण, संतोष शिंदे, संतोष कांबळे अस्लम शेख, सूरज भराटे, अक्षय आरकसूळ, ओम परदेशी, डॉ. अभिजीत सांगडे, डॉ. सुपेकर, डॉ. प्रफुल्ल तपशाळकर, डॉ. सत्यजित शिराळे, डॉ. अर्पिता, डॉ. अंजली ढोणे, प्रियंका सर्वज्ञ पाटील तसेच तालेरा रुग्णालयाचे कुटुंब कल्याण विभागाचे ए.एन.एम. आशा, महिला आरोग्य समितीचे सर्व अधिकारी व कर्मचारी वर्ग उपस्थित होते. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे शहर संघटक संतोष सौंदणकर यांनी आभार मानले.

आरोग्य शिबिराचे उद्घाटन पिंपरी-चिंचवड महानगरपालिका वैद्यकीय अधिक्षक डॉ. लक्ष्मण गोफणे, डॉ. अभयचंद्र दादेवार व शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे शहर संघटक संतोष सौंदणकर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी यूनिसफचे सदस्य उपस्थित होते. डॉ. संगिता तिरुमणी, डॉ. प्रफुल्ल तपशाळकर, डॉ. असावरी ढवळे नोडल ऑफिसर तालेरा रुग्णालय यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले. डॉ. आसावरी ढवळे यांनी आरोग्य विषयी समुपदेशन केले व महिला, लहान बालक आणि जेष्ठ नागरिक यांनी आपल्या आरोग्याकडे लक्ष द्यावे, असे मार्गदर्शन केले व तसेच दर महिन्याच्या दुसऱ्या गुरुवारी सकाळी ९ ते ४.३० या वेळेत आयोजन केले जाईल, असे सांगितले.

# मोशीत गणरायांच्या स्वागताची जय्यत तयारी!

## परिसरात मांडव उभारणीला वेग, ६५ मंडळाकडून होणार जल्लोष

**मनीषा थोरात-पिसाळ**

**मोशी- न्यूज एक्स्प्रेस ।** परिसरात लाडक्या बाप्पांच्या स्वागताची जोरदार तयारी सुरु झाली आहे. चार दिवसांवर बाप्पांचे आगमन होणार असल्याने ठिकठिकाणी मांडव उभारणीच्या कामाला वेग आला आहे. परिसरात ६५मंडळ आणि सोसायट्यांकडून मोठा जल्लोष साजरा होणार आहे. नोंदणीकृत मंडळांकडून प्रशासनाने घातलेले नियम पाळले जात असल्याचे चित्र पहायला मिळत आहे. पोलिस प्रशासनाकडून गणेशोत्सव शांततेत पार पाडण्यासाठी नियम आणि सूचना दिल्या आहेत. परिसरात गणेशोत्सव साजरा करताना सामान्य नागरिकांना आणि वाहनचालकांना कुठलाही त्रास करावा लागणार नाही, याची सोय गणेशमंडळांनी केली आहे. मंडळांच्या



स्वंयसेवकांनी याची खबरदारी घेतली आहे. परिसरातील जय भारत प्रतिष्ठांन तबाजीनगर देहूरस्ता मित्रमंडळ, हनुमान तरूण मित्र मंडळ, शिवप्रताप मित्र मंडळ अशा मंडळांकडून मांडव उभारणीच्या कामाला सुरुवात झाली आहे.जय भारत प्रतिष्ठान चे अध्यक्ष सुधीर तापकीर म्हणाले, पोलिस प्रशासनाकडून दिलेल्या सूचनांचा आदर करून गणेशोत्सव साजरा केला जाणार आहे. मंडळाचे हे ३५ वे वर्षे आहे. लोकमान्य टिळक यांनी एकोप्याचा संदेश देण्यासाठी गणेशोत्सव सुरु केला. हाच एकोपा टिकवण्यासाठी आमचे मंडळ काम करते आहे. मोशी गावठाणातील बोराटे आळी साईनाथ / बोराटे तालीम मित्र मंडळाकडून मागील ६५ पेक्षा अधिक वर्षापासून गणेशोत्सव साजरा केला जातो. भजन किर्तन, धार्मिक देखावे, विद्युत रोषणाई, पर्यावरण आणि सामाजिक संदेश दिले जातात. विविध विषयांवरील जनजागृतीसाठी लोकनाट्य सादरीकरण केले जाते. पोलिस प्रशासनाने घालून दिलेल्या नियमांचे पालन करून गणेशोत्सव साजरा केला जात असल्याची माहिती मंडळाचे अध्यक्ष संतोष बोराटे यांनी दिली. परिसरातील गणेश मंडळांचे अध्यक्ष आणि पदाधिकाऱ्यांची नुकती बैठक घेण्यात आली. यावेळी डीसीपी, एसीपी, महापालिकेचे अधिकारी उपस्थित होते. यामध्ये मंडळांच्या पदाधिकाऱ्यांना सूचना करण्यात आल्या. परवाणगी घेऊनच देखावे उभे करा. ईदमिलाद आणि अनंत चतुर्दशी एकाच दिवशी येत असल्याने सलोख्याचे वातावरण ठेवा. सर्वसामान्यांना कुठल्याही प्रकारचा त्रास होणार नाही याची काळजी घ्या, गणेशोत्सवासाठी उभारण्यात येणाऱ्या मंडपाचा आकार दहा फूट रूंद,दहा फूट लांब असावा, मंडळांना देखावे करताना कोणतेही आक्षेपार्ह देखावे नसावेत. ध्वनीक्षेपनाची मर्यादा असावी अशा सूचना देण्यात आल्या असल्याची माहिती भोसरी एमआयडीसीचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक राजेंद्र निकाळजे यांनी दिली.

### नियमांचे पालन करून गणेशोत्सव

» मोशी गावठाणातील बोराटे आळी साईनाथ / बोराटे तालीम मित्र मंडळाकडून मागील ६५ पेक्षा अधिक वर्षापासून गणेशोत्सव साजरा केला जातो. भजन किर्तन, धार्मिक देखावे, विद्युत रोषणाई, पर्यावरण आणि सामाजिक संदेश दिले जातात. विविध विषयांवरील जनजागृतीसाठी लोकनाट्य सादरीकरण केले जाते. पोलिस प्रशासनाने घालून दिलेल्या नियमांचे पालन करून गणेशोत्सव साजरा केला जात असल्याची माहिती मंडळाचे अध्यक्ष संतोष बोराटे यांनी दिली.

# पुणेकरांचे ३५४ कोटी रुपये जाणार ‘पाण्यात’!

## पालिकेला भरावी लागणार ३५४.२३ कोटी दंडाची रक्कम

पुणे। न्यूज एक्सप्रेस मराठी। मापदंडापेक्षा जादा पाणीवापर आणि सांडपाणी प्रक्रिया न करता थेट नदीत सोडण्याची जबर किंमत महापालिकेला मोजावी लागणार आहे. जलसंपदा विभागाने तब्बल ३५४.२३ कोटी रुपयांची दंडाची रक्कम भरावी लागणार असल्याचे महापालिकेला कळविले आहे. तसेच महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाकडून (महाराष्ट्र वॉटर रिसोर्सेस रेग्युलेटरी ॲथॉरिटी – एमडब्ल्यूआरआरए) वाढविण्यात आलेल्या जलदरांमुळे मूळ पाणीपट्टीही वाढली आहे. या पार्श्वभूमीवर वाढलेली पाणीपट्टी, मंजूर कोट्यापेक्षा जादा पाणी वापरणे आणि सांडपाणी थेट नदीत सोडणे याचा एकत्रित महापालिकेला थकबाकीसह तब्बल ६४१.८६ कोटी रुपयांचा भुर्दंड पडणार आहे. जलसंपदा विभागाकडून राज्यातील घरगुती आणि



औद्योगिक पाणीपट्टीत गेल्या वर्षी वाढ करण्यात आली. त्यानुसार घरगुती वापरासाठी प्रति हजार लिटरला ३० ते ६० पैसे, औद्योगिक प्रक्रिया उद्योगांना प्रति हजार लिटरला ६.२० ते १२.४० रुपये आणि कच्च्या मालावर प्रक्रिया करणाऱ्या उद्योगांना प्रति हजार लिटरला ४५ ते ९० रुपये वाढ करण्यात आली आहे.

नवे दर गेल्या वर्षी १ जुलै रोजी सुरू झालेल्या जलवर्षापासून लागू करण्यात आले आहेत. या दरात सन २०२३-२४ मध्ये दहा टक्के, तर सन २०२४-२५ या जलवर्षासाठी २० टक्के वाढ होणार आहे. तसेच मंजूर पाणी कोट्यापेक्षा १०० ते १२५ टक्के जादा पाणीवापर केल्यास महापालिकांना अनुज्ञेय दराच्या दीडपट, १२५ टक्क्यांपेक्षा जास्त पाणीवापर केल्यास अनुज्ञेय दराच्या तिप्पट दर आकारण्यात येणार आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांनी सांडपाणी नैसर्गिक प्रवाहात किंवा कालव्यात सोडण्यापूर्वी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या प्रमाणित मानकांनुसार प्रक्रिया करणे गरजेचे आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांनी त्यांच्या पाणीवाटपाच्या आधारावर सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प स्थापित केला नसल्यास किंवा पूर्ण क्षमतेने सुरू नसल्यास मंजूर पाणीकोटा किंवा प्रत्यक्ष पाणीवापर यापैकी जे अधिक असेल त्याच्या दुप्पट दंड आकारणी केली जाणार आहे. याबाबत बोलताना खडकवासला पाटबंधारे विभागाच्या कार्यकारी अभियंता श्वेता कुऱ्हाडे म्हणाल्या, ‘महापालिकेला

### पाणीपट्टीत गेल्या वर्षी वाढ

» जलसंपदा विभागाकडून राज्यातील घरगुती आणि औद्योगिक पाणीपट्टीत गेल्या वर्षी वाढ करण्यात आली. त्यानुसार घरगुती वापरासाठी प्रति हजार लिटरला ३० ते ६० पैसे, औद्योगिक प्रक्रिया उद्योगांना प्रति हजार लिटरला ६.२० ते १२.४० रुपये आणि कच्च्या मालावर प्रक्रिया करणाऱ्या उद्योगांना प्रति हजार लिटरला ४५ ते ९० रुपये वाढ करण्यात आली आहे. नवे दर गेल्या वर्षी १ जुलै रोजी सुरू झालेल्या जलवर्षापासून लागू करण्यात आले आहेत. या दरात सन २०२३-२४ मध्ये दहा टक्के, तर सन २०२४-२५ या जलवर्षासाठी २० टक्के वाढ होणार आहे. तसेच मंजूर पाणी कोट्यापेक्षा १०० ते १२५ टक्के जादा पाणीवापर केल्यास महापालिकांना अनुज्ञेय दराच्या दीडपट, १२५ टक्क्यांपेक्षा जास्त पाणीवापर केल्यास अनुज्ञेय दराच्या तिप्पट दर आकारण्यात येणार आहे.

खडकवासला धरणातून ११.६० अब्ज घनफूट (टीएमसी), पवनातून ०.३४ टीएमसी, तर भामा आसखेडमधून २.६७ टीएमसी असे एकूण १४.६१ टीएमसी पाणी वर्षाला मंजूर आहे. हे आरक्षण २०३१ सालच्या संभाव्य ७६.१६ लाख लोकसंख्येसाठी मंजूर आहे. प्रत्यक्षात महापालिकेकडून जादा पाणीवापर करण्यात येतो. तसेच सांडपाणी प्रक्रिया न करता थेट नदीत सोडण्यात येते. त्यामुळे महापालिकेला दंडासह पाणीपट्टी देयके सन २०१६ पासूनची पाठविण्यात आली आहेत. याबाबत आयोजित बैठकीत या सर्व बाबी निदर्शनास आणल्या जातील.

# फूट पडली नसल्याचं निवडणूक आयोगाला सांगितलं!

## कंत्राटी कर्मचारी भरतीवरूनही जयंत पाटील यांचे सरकारवर टीकास्त्र

पुणे। न्यूज एक्सप्रेस मराठी। आम्ही निवडणूक आयोगाला पक्षात फूट पडली नसल्याचे सांगितले आहे. मात्र, आयोगाने आमची बाजू न ऐकता फूट पडल्याचे जाहीर केले आहे. निवडणूक आयोग अयोग्य वागत आहे, असा याचा अर्थ निघतो. याबाबत आम्ही मात्र, वकिलांचा सल्ला घेत असून, निवडणूक आयोगासमोर बाजू मांडणार असल्याचे राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी स्पष्ट केले. पुण्यातील वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूटच्या बैठकीनंतर जयंत पाटील प्रसारमाध्यमांशी बोलत होते. केंद्रीय निवडणूक आयोगाने राष्ट्रवादीत दोन गट पडल्याचे



निश्चित केले आहे. खरा पक्ष कोणाचा याचा निर्णय सहा ऑक्टोबरला केंद्रीय निवडणूक आयोग घेणार आहे. त्यामुळे राष्ट्रवादी हा शरद पवार की अजित पवार यांचा, हे सहा ऑक्टोबरला कळेल. यावर राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी ही प्रतिक्रिया दिली. उपमुख्यमंत्री अजित पवार हे वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूटच्या बैठकीला उपस्थित नव्हते. याबाबत विचारले असता अजित पवार उपमुख्यमंत्री आहेत. कदाचित त्यांना दुसरी कामे असतील. त्यामुळे येणे शक्य झाले नसेल, असे उत्तर त्यांनी दिले. कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या नियुक्तीच्या राज्य सरकारच्या निर्णयाबाबत बोलताना पाटील म्हणाले, सरकारी कर्मचाऱ्यांवर महत्त्वाच्या जबाबदाऱ्या असतात. तिथे कंत्राटी कर्मचारी नियुक्त करणे चुकीचे आहे. जबाबदारीची पदेही कंत्राटी पद्धतीने भरणे, हा अतिशय गंभीर प्रश्न आहे. पैसे वाचवण्यासाठी बेभरवशाच्या लोकांना तात्पुरत्या सेवेत

### जयंत पाटीलांची सरकारवर टीका

» कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या नियुक्तीवरूनही जयंत पाटील यांनी सरकारवर टीका केली आहे. सरकारी कर्मचाऱ्यांवर महत्वाच्या जबाबदाऱ्या असतात. तिथे कंत्राटी कर्मचारी नियुक्त करणं चुकीचं आहे. जबाबदारीची पदेही कंत्राटी पद्धतीनं भरली तर अतिशय गंभीर प्रश्न आहे. पैसे वाचवण्यासाठी बेभरवशाच्या लोकांना तात्पुरत्या सेवेत घेऊन काही कामे करून घेतली आणि त्यात चूका आढळल्या, तर त्याचा भुर्दंड जनतेला बसू शकतो. कंत्राटी कर्मचारी नियुक्तीत मर्यादा असल्या पाहिजे. अन्यथा सरकारच कंत्राटी पद्धतीनं चालवायला लागेल, असं जयंत पाटील यांनी म्हटलं.

घेऊन काही कामे करून घेतली आणि त्यात चुका आढळल्या, तर त्याचा भुर्दंड जनतेला बसू शकतो. कंत्राटी कर्मचारी नियुक्तीला काही मर्यादा असल्या पाहिजेत. नाहीतर हळूहळू सर्व सरकार कंत्राटी पद्धतीने चालायला लागेल, अशी भीतीही त्यांनी व्यक्त केली. अजित पवार वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूच्या बैठकीला उपस्थित नव्हते. याबद्दल प्रश्न विचारल्यावर जयंत पाटील यांनी म्हटलं, अजित पवार उपमुख्यमंत्री आहेत. कदाचित त्यांना दुसरी काम असतील. त्यामुळे येणं शक्य झालं नसेल.

# एफआरपीपेक्षा ४०० रुपये अधिकचे द्या!

## साखर गाळप हंगाम सुरू होऊ देणार नाही : राजू शेट्टी

**पुणे । न्यूज एक्स्प्रेस मराठी।** सरकारच्या एफआरपी दरानुसार प्रतिक्विंटल ३१०० रुपयांचा भाव साखर कारखान्यांकडून ऊस गाळपसाठी शेतकऱ्यांना दिला जातो. मात्र, यंदाच्या वर्षी सरासरीपेक्षा प्रतिक्विंटल ५०० रुपये अधिक कारखान्यांना मिळालेले आहे. त्यामुळे सदर रकमेपैकी ४०० रुपये प्रतिक्विंटल शेतकऱ्यांना उसाचा गाळप हंगाम सुरू होण्यापूर्वी देण्यात यावी. दोन ऑक्टोबर पर्यंत निर्णय न घेतल्यास राज्यातील साखर गाळप हंगाम सुरू होऊ देणार नाही असा इशारा स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते राजू शेट्टी यांनी शुक्रवारी पत्रकार परिषदेत दिला. शेट्टी म्हणाले ,आंतरराष्ट्रीय



बाजारात साखरेला चांगल्या प्रकारे भाव मिळत असून सुद्धा सरकारने साखरेला निर्यात बंदी केलेली आहे. रासायनिक खताच्या किमती वाढत असून शेतकरी उत्पादन खर्च वाढतो आहे. अशावेळी आंतरराष्ट्रीय बाजारात ६२०० रुपये प्रतिक्विंटल भाव मिळतो. मात्र ,आपल्याकडे केवळ ३१०० रुपये भाव दिला जात आहे. महाराष्ट्रातील कारखान्यांना आणि आणि इथेनॉल निर्मिती यातून ५०० रुपये अधिकचा दर प्रतिक्विंटल मिळालेला आहे. त्यानुसार शेतकऱ्यांना ५०० रुपये अधिक वितरित केले. मात्र, इतर कारखान्यांनी अशाप्रकारे शेतकऱ्यांना अतिरिक्त पैसे दिले नाही. त्यामुळे शेतकऱ्यांना साखर कारखान्यांनी ४०० रुपये अतिरिक्त मागणी आहे. शेट्टी म्हणाले, साखर कारखाना हिशोब ठेवण्यासाठी साखर आयुक्तालय यांनी कारखान्याचे ऑडिट रिपोर्ट ठेवणे आवश्यक आहे. मात्र, मागील तीन वर्ष पासून कारखान्याचे ऑडिट न करता कारखान्यांना सूट दिली गेली आहे. शेतकऱ्यांचे पैसे बुडवा आणि त्याला शासनाचा पाठिंबा आहे असा मेसेज जनतेत यातून जात आहे. यंदा राज्यात दुष्काळामुळे ४० ते ५० टक्के उत्पादनात घट होणार असून साखरेचे भाव वाढत असताना सरकारने पिक विमा बाबत ब्रिटिशकालीन अयोग्य निकष ठेवलेले असून त्यात बदल करणे गरजेचे आहे.

### ४०० रुपये अतिरिक्त मागणी

» आंतरराष्ट्रीय बाजारात साखरेला चांगल्या प्रकारे भाव मिळत असून सुद्धा सरकारने साखरेला निर्यात बंदी केलेली आहे. रासायनिक खताच्या किमती वाढत असून शेतकरी उत्पादन खर्च वाढतो आहे. अशावेळी आंतरराष्ट्रीय बाजारात ६२०० रुपये प्रतिक्विंटल भाव मिळतो. मात्र ,आपल्याकडे केवळ ३१०० रुपये भाव दिला जात आहे. महाराष्ट्रातील कारखान्यांना आणि आणि इथेनॉल निर्मिती यातून ५०० रुपये अधिकचा दर प्रतिक्विंटल मिळालेला आहे. त्यानुसार शेतकऱ्यांना ५०० रुपये अधिक वितरित केले. मात्र, इतर कारखान्यांनी अशाप्रकारे शेतकऱ्यांना अतिरिक्त पैसे दिले नाही. त्यामुळे शेतकऱ्यांना साखर कारखान्यांनी ४०० रुपये अतिरिक्त मागणी आहे.

# जातीय सलोखा ठेवून गणेशोत्सव साजरा करावा!

## उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे आवाहन

**पुणे । न्यूज एक्स्प्रेस मराठी।** राज्यात काही दिवसातच गणरायाचे आगमन होणार असून नागरिकांनी जातीय सलोखा ठेवून गणेशोत्सव साजरा करावा, तसेच जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केले. श्री छत्रपती शिवाजी मार्केट यार्ड गणेशोत्सव मंडळाच्यावतीने तयार करण्यात आलेल्या शेतकऱ्यांसाठी मोफत अन्नदान कक्षाचे उद्घाटन, शारदा गजानन पुरस्कार व जिल्हा स्तरीय महिला व पुरुष कबड्डी स्पर्धा बक्षिस वितरण सोहळ्यात ते बोलत होते. यावेळी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती दिलीप काळभोर, संचालक गणेश घुले, कार्याध्यक्ष प्रसाद गव्हाणे, गणेश मंडळाचे अध्यक्ष सागर भोसले आदी



उपस्थित होते. पवार म्हणाले, श्री छत्रपती शिवाजी मार्केट यार्ड गणेशोत्सव मंडळातर्फे देण्यात येणारे विविध पुरस्कार आणि शेतकरी बांधवांसाठी मोफत भोजनाचा उपक्रम चांगला आहे. शेतकरी कष्टकरी आहे, लाखाचा पोशिंदा आहे. शेतमालातील चढउतार लक्षात घेऊन बाजारभाव शेतकऱ्यांना आणि ग्राहकांना परवडण्याच्या दृष्टीने शासनाकडून समन्वय साधण्याचा प्रयत्न केला जातो. राज्यातील काही भागात सध्या अवर्षणाची परिस्थिती आहे. गेल्या चार-पाच दिवसात काही ठिकाणी पाऊस झाला असला तरी तो पुरेसा नाही. शेतकऱ्यांसमोर बिकट संकट उभे राहिले असून पिकांचे नुकसान होत आहे. पीक विम्याची रक्कम शेतकऱ्यांना मिळवून देण्यासाठी, शेतकऱ्यांपुढील संकटावर मात करण्यासाठी शासन निधीची कमतरता पडू देणार नाही, असेही ते म्हणाले. कृषी उत्पन्न बाजार समितीच्या अडीअडचणी, शेतकऱ्यांच्या काही सूचना असतील तर त्या सोडविण्यासाठीचा प्रस्ताव सादर करावा. पणन मंत्री, संबंधित अधिकाऱ्यांसोबत बैठक घेऊन शेतकऱ्यांचे प्रश्न मार्गी लावले जातील. स्वच्छतेबाबत मार्केट यार्ड आणि पुणे महानगरपालिकेने समन्वय ठेवावा. पुणे येथील कृषी उत्पन्न बाजार समिती सर्वच बाबतीत पुढे राहील, तिचा नावलौकिक वाढेल यासाठी सर्वांनी प्रयत्न करावेत, अशी अपेक्षा उपमुख्यमंत्र्यांनी व्यक्त केली. बालेवाडी येथे ऑलिंपिक भवनाच्या उभारण्यासाठी ७५ कोटीचा आराखडा तयार करण्यात आला आहे. त्याला मूर्तस्वरूप देण्याचे काम अंतिम टप्प्यात आले आहे. विभागीय, जिल्हा आणि तालुका क्रिडा संकुलासाठी निधी देण्यात येत आहे. देशाला पहिले ऑलिम्पिक पदक मिळवूण देणाऱ्या स्व. खशाबा जाधव यांचा जन्म दिन आपण राज्य क्रीडा दिन म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेतला आहे.

### खेळाडूंना प्रोत्साहन मिळावे

» बालेवाडी येथे ऑलिंपिक भवनाच्या उभारण्यासाठी ७५ कोटीचा आराखडा तयार करण्यात आला आहे. त्याला मूर्तस्वरूप देण्याचे काम अंतिम टप्प्यात आले आहे. विभागीय, जिल्हा आणि तालुका क्रिडा संकुलासाठी निधी देण्यात येत आहे. देशाला पहिले ऑलिम्पिक पदक मिळवूण देणाऱ्या स्व. खशाबा जाधव यांचा जन्म दिन आपण राज्य क्रीडा दिन म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेतला आहे. खेळाडूंना प्रोत्साहन मिळावे म्हणून बक्षिसांच्या रकमेत वाढ करण्यात आली आहे. पुणे जिल्ह्यातून आता पुणे शहर, पिंपरी-चिंचवड शहर आणि पुणे ग्रामीण असे ३ संघ क्रीडा स्पर्धेत सहभागी होतात.